माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ : प्रात्यक्षिक कार्य व सादरीकरण
(वेळ मर्यादा ९० मिनिटे)

प्रशिक्षणार्थींचे ०५ गट पाडावेत प्रत्येक गटाला खालीलपैकी प्रत्येकी ०६ केस स्टडी द्याव्यात त्यावर चर्चा करण्यास सांगावे.

१) निरामय फाऊंडेशन ही एक सार्वजनिक विश्वस्त संस्था आहे. ती परदेशातून मिळालेल्या मदत निधीतून चालते. या संस्थेकडून श्री. रामराव यांना संस्थेच्या कारभाराबाबत माहिती हवी आहे. संस्थेने जन माहिती अधिकाऱ्याची नेमणूक केलेली नाही.

२) वर्ल्ड हेल्थ ऑर्गनाझेशनकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीवर निरामय फाऊंडेशन एक हॉस्पीटल चालवित आहे. या संस्थेला शासनाने परदेशातून आणलेल्या सामुग्रीवर जकात माफी दिलेली आहे. त्यांनी आणलेल्या यंत्र सामुग्रीबाबत त्यांनी तपशीलवार माहिती स्थानिक एक्साईज कलेक्टरना द्यावयाची आहे. त्यांनी कोणकोणती यंत्रसामुग्री आयात केली आहे व त्यावर किती जकात माफ केली आहे याची माहिती रामराव यांना हवी आहे.

३) सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत एका पुलाचे बांधकाम चालु आहे. त्या पुलाच्या प्लॅन व एस्टीमेटची कॉपी रामराव यांनी माहितीच्या अधिकारात मिळवली. त्यांना या कामावर वापरण्यात येणाऱ्या कॉंक्रीटींगचे कामी विहित प्रमाणात सिमेंट वापरण्यात येत नाही असा संशय येत असल्याने ते प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी गेले असता त्यांना आपला संशय खरा असल्याचे दिसून आले. त्यांनी कामाच्या ठिकाणी हजर असलेल्या अभियंत्यास अभिप्राय नोंदविण्यासाठी अभिप्राय पुस्तकाची मागणी केली. सदर अभियंत्याने असे अभिप्राय पुस्तक ठेवण्यात येत नाही असे सांगितले. असे अभिप्राय पुस्तक देण्याचे नाकारले.

४) नगरपालिकेतर्फे बांधण्यात येणाऱ्या हॉस्पीटलचे प्लॅन व एस्टीमेटची प्रमाणित प्रत एक सज्जन नागरिक श्री. गणपतराव यांनी मागणी केली आहे. मंजूर प्लॅन व एस्टीमेटची प्रमाणित प्रत मिळण्याची नगरपालिकेने विहित केलेली फी रूपये ७५०/- आहे. ती न भरता आपल्याला फक्त झेरॉक्स प्रती प्रमाणित करून द्याव्यात. त्याची प्रत्यक्ष खर्चाची रक्कम भरण्यास आपण तयार आहोत असे श्री. गणपतराव यांचे म्हणणे आहे.

५) झिगरख एका महाविद्यालयात शिकतो. हे महाविद्यालय पारंपारिक महाविद्यालयाशी संलग्न आहे. त्याला महाविद्यालयाने प्रवेश प्रक्रियेत काही गफलत केली असा संशय आहे. त्याने महाविद्यालयाकडे प्रवेश प्रक्रियेबाबतच्या काही कागदपत्रांची माहितीच्या अधिकारात मागणी केली असता तो अर्जदार सज्ञान नसल्याचे कारणावरून फेटाळण्यात आली.

६) आपल्या संस्थेत काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना किती वेतन व भत्ते मिळतात, हे प्रसिद्ध करण्यास वा त्याची माहिती देण्यास एका सार्वजनिक प्राधिकरणाने ही माहिती दिल्यास कर्मचाऱ्याच्या खाजगी जीवनावर अतिक्रमण होईल, या सबबीवर नाकारले आहे.

७) नगरपालिकेच्या जन माहिती अधिकाऱ्याकडे एक नागरिक समक्ष अर्ज देण्यासाठी उपस्थित झाला आहे. सदर नागरिकास हवी असलेली माहिती शासकीय जमिनी संबंधी असून ती नगरपालिकेच्या कार्यालयात उपलब्ध नाही. सदर जन माहिती अधिकाऱ्याने त्या नागरिकास आपला अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकाऱ्याकडे सादर करण्याचा सल्ला देऊन पाठवून दिले.

८) एका नागरिकाने त्याला जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागात उपलब्ध असलेले पत्र माहिती संदर्भात माहितीच्या अधिकारात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नावे अर्ज पोस्टाने सादर केला. तो उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने टपालातून संबंधित विभागांकडे रवाना केला. संबंधित विभागात तो अर्ज गहाळ झाला. परिणामत: अर्जदारास काहीच उत्तर मिळाले नाही. आपणास तीस दिवसात माहिती मिळाली नाही म्हणून त्याने अपिलिय अधिकाऱ्याकडे अपील सादर केले.

९) वरील प्रकरणातील अर्जदाराची तीस दिवसात माहिती मिळाली नाही म्हणून विनाशुल्क माहिती मिळावी अशी मागणी आहे.

१०) एका दारिद्र्यरेषेखालील नागरिकाने खात्याकडील/शासकीय माहिती अधिकाऱ्याकडे इमारतीच्या बांधकामाच्या निविदे संबंधीची कागदपत्रे मागितली असता सदरच्या माहितीचा तुमचेशी काय संबंध आहे व तिचा तुम्ही काय उपयोग करणार आहात अशी विचारणा केली आहे.

११) श्री. जाधव यांचे पाच मुले एकाच गावात राहतात. त्यांनी प्रत्येकाने विद्युत कंपनीकडे एकच विशिष्ट माहिती मागविण्यासाठी स्वतंत्र अर्ज केलेले आहेत. जन माहिती अधिकाऱ्याने फक्त वडिलांस माहिती देऊन इतर अर्जदारांना तुमच्या वडिलांना माहिती दिली असून तुमचे अर्ज निकाली काढले आहेत असे कळविले.

१२) श्री. जाधव यांना हवी असलेली माहिती विद्युत वितरण कंपनीच्या तीन वेगवेगळ्या कार्यालयात उपलब्ध असल्याने त्यांनी या तिनही कार्यालयाकडून सदरची माहिती मिळण्यासाठी अर्ज सादर केले. पैकी तिनही कार्यालयाने एकमेकांस वरिष्ठ, कनिष्ठ आहेत. वरिष्ठ कार्यालयाने त्यांच्याकडे सर्व माहिती उपलब्ध असल्याने अर्जदारास माहिती दिली, हे समजल्यावरून इतर दोन अधिकाऱ्यांना आता माहिती देण्याची आवश्यकता राहिली नाही असे ठरवून त्यांचेकडे प्राप्त झालेले अर्ज निकाली काढले.

१३) एका सार्वजनिक प्राधिकरणाने माहितीच्या अधिकाराचा कायदा अस्तित्वात आल्यानंतर प्राधिकरणांच्या प्रचलित नियमानुसार आवश्यक ती कारवाई करून जतन करून ठेवण्याची कालावधी उलटून गेलेले अभिलेख नष्ट करून टाकले. त्यामुळे अर्जदाराला आवश्यक असलेली माहिती मिळणे आता दुरापास्त झाले आहे.

१४) अर्जदाराने मागितलेली माहिती तीस दिवसाच्या आत उपलब्ध झाली नाही म्हणून अर्जदाराने नंतर १५ दिवसांनी अपिलीय अधिकाऱ्याकडे अपील अर्ज सादर केला. त्याच्या सुनावणीनंतर जन माहिती अधिकाऱ्यास नाकारण्याची कारणे न दर्शविता अपिलिय अधिकाऱ्याने योग्य ती फी भरून घेऊन अर्जदारास माहिती पुरविण्याचा अपिलीय अधिकाऱ्याने निर्णय दिला.

१५) माहिती अधिकाराखाली माहिती मागणीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर २९ दिवस जन माहिती अधिकारी रजेवर असल्याने त्यांनी अर्जदारास रजेवरून परत आल्यावर आठ दिवसांनी शुल्काची रक्कम कळविली व ती न भरल्यामुळे माहिती पुरविली नाही.

१६) माहिती अधिकाराखाली माहिती मागणीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर ११ दिवसांनी माहिती अधिकाऱ्याने माहिती तयार करून अर्जदारास माहिती तयार करण्याचे शुल्क रूपये १५,०००/- भरण्याची सुचना पाठविली परंतु तीन महिने उलटून गेले तरीही अर्जदार पैसे भरण्यास आला नाही. त्यामुळे माहिती तयार करण्याचा प्राधिकरणाचा खर्च वाया गेला.

१७) श्री. गायकवाड हे दारिद्र्यरेषेखालील नागरिक आहेत. त्यांनी तालुका कृषि कार्यालयाच्या माहिती अधिकाऱ्याकडे त्यांच्या भांडारात असलेल्या टोमॅटोच्या बियाण्याचा नमुना १ ग्रॅम फक्त मागणी केला आहे. आपण दारिद्र्यरेषेखालील नागरिक असल्यामुळे हा नमुना विनामुल्य मिळावा अशी त्यांची मागणी आहे.

१८) श्री. जगतोरणे यांनी एका प्राधिकरणाच्या माहिती अधिकाऱ्याकडे माहितीच्या अधिकाराखाली काही नमुने (samples) ची मागणी केली. संबंधित माहिती अधिकाऱ्याने या नमुन्याची प्रत्यक्ष किंमत रूपये ५०००/- ची मागणी केली आहे. ही किंमत अवाजावी आहे असे अर्जदाराचे मत असून त्या विरूद्ध अपिलीय अधिकाऱ्याकडे अपिल दाखल केले. दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकून घेऊन अपिलीय अधिकारी यांनी अत्यंत किरकोळ स्वरूपाचा बदल करून सदरची माहिती अर्जदारास देण्यात यावी असे आदेश दिले. तथापि, आता मध्यंतरीच्या काळात ३० दिवसांपेक्षा जास्त कालावधी गेला असल्यामुळे सदरची माहिती (samples) विनामुल्य मिळणेस आपण पात्र झालो आहोत असे अर्जदार याचे म्हणणे आहे.

१९) श्री. भोसले यांनी एका सार्वजनिक प्राधिकरणाच्या माहिती अधिकाऱ्याकडे माहितीच्या अधिकारात काही माहिती मिळण्यासाठी अर्ज सादर केला. या अर्जास माहिती अधिकाऱ्याकडून ३० दिवसात काहीच उत्तर आले नाही म्हणून अर्जदाराने अपिलीय अधिकाऱ्याकडे अपिल सादर केले. अपिलीय अधिकाऱ्याने अपिलाचे सुनावणीनंतर सदरची माहिती अर्जदारास १५ दिवसात द्यावी असे आदेश दिले. माहिती अधिकाऱ्याने या माहितीचे मूल्य म्हणून रू. १२००/- ची मागणी अर्जदार यांचेकडे केली आहे.

२०) माहितीच्या अधिकारात केलेल्या अर्जास काहीच उत्तर न आल्याने अर्जदाराने ४५ दिवस वाट पाहून अपिलीय अधिकाऱ्याकडे अपील सादर केले. अपीलाची सुनावणी होऊन अपीलीय अधिकाऱ्याने अर्जदाराचे अपील मान्य करून त्याला १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे आदेश दिले. त्यानंतर माहिती अधिकाऱ्याने अर्जदारास त्याने मागणी केलेली माहिती पुरविली. परंतु देण्यात आलेली माहिती चुकीची वा अपुरी आहे म्हणून अर्जदाराने पुन्हा अपीलीय अधिकाऱ्याकडे अपील केले. याच अर्जदाराने याच माहिती कामी पूर्वी एकदा अपील केले असल्यामुळे आता दुसरे अपील आयोगाकडे करणे जरूरी आहे म्हणून अपिलीय अधिकाऱ्याने अपील फेटाळून लावले आहे.

२१) माहिताच्या अधिकारात सादर करण्यात आलेल्या अर्जास जन माहिती अधिकाऱ्याने उपलब्ध माहिती योग्य ती फी भरून पुरविली. परंतु अर्जदाराने मागितलेल्या माहितीपैकी काही महिती ही वर्जित प्रयोजनात (सेक्शन ८) मोफत असल्यामुळे ते देण्याचे नाकारले. आपणास दिलेली माहिती अर्धवट आहे, अशी अर्जदाराची तक्रार असून त्याबाबत त्याने अपील केले आहे.

२२) माहितीच्या अधिकारात अर्जदाराने मागविलेल्या माहितीपैकी काही माहिती गोपनीय स्वरूपाची असल्याने अर्जदाराची पूर्ण मागणी अपीलीय अधिकाऱ्याने फेटाळून लावली.

२३) अर्जदाराने एका सार्वजनिक प्राधिकरणाने निविदा मागवून जे काम ठेकेदारास दिले होते, त्या बाबतच्या निविदांच्या प्रतींची मागणी सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहितीच्या अधिकारात केली होती. या निविदा गोपनीय स्वरूपाच्या होत्या, त्या सादर करणारे त्रयस्थ व्यक्ती ठरत असल्याने त्रयस्थ व्यक्ती बाबतची माहिती तीही गोपनीय स्वरूपाची असल्याने देता येणार नाही म्हणून असे कारण दाखवून जन माहिती अधिकाऱ्याने सदरचा अर्ज फेटाळून लावला.

२४) माहितीच्या अधिकारात एका अर्जदाराने एका शासकीय अधिकाऱ्याच्या सेवानोंद पुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत मागितली. सदरची माहिती मागितल्याने संबंधित सरकारी अधिकाऱ्याच्या खाजगी जीवनावर अतिक्रमण होईल व ती त्रयस्थ व्यक्तीबद्दलची आहे, या सबबीवर नाकारण्यात आली.

२५) माहिती अधिकारात मागविण्यात आलेली माहिती नाकारण्यात आलेल्या अर्जदाराने सदर निर्णयाविरूद्ध केलेल्या अपिलात नाकारण्याची कारणे चुकीची वा खोटी आहेत या कारणाशिवाय माहिती अधिकाऱ्यावर अनेक वैयक्तिक आरोप केले आहेत. अपिलीय अधिकाऱ्याने हे सर्व आरोप खोटे आहेत हे सिद्ध करण्याची जबाबदारी कलम १९ (५) प्रमाणे माहिती अधिकाऱ्याची असल्याने त्याबद्दल त्यास नोटीस काढली आहे.

२६) अपीलीय अधिकाऱ्याने ४५ दिवसात अपीलाचा निर्णय दिलेला नाही. अर्जदारास माहितीची अत्यंत गरज असल्याने त्याने या बाबतीत काय करता येईल याबाबत सल्ला घेतला असता त्यास मूळ अपिलाचा निर्णयच झाला नाही, त्यामुळे दुसरे अपील करता येणार नाही असे सांगण्यात आले.

२७) नगर विकास खात्याकडील जन माहिती अधिकाऱ्याकडे त्यांच्या अखत्यारितील नगरपालिकेच्या विकास आराखड्या बाबतच्या माहितीची माहितीच्या अधिकारात मागणी झाली असता अर्जदारास संबंधित माहिती अधिकाऱ्याने त्याच्या कार्यालयात असलेली माहिती पुरविली. उरलेली माहिती संबंधित नगरपालिकेत असल्याचे अर्जदारास संबंधित नगरपालिकेशी संपर्क साधण्यास सांगण्यात आले.

२८) एका सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकाऱ्याने खालील कारण दर्शवून माहितीच्या अधिकाराखालील अर्ज फेटाळला आहे –

"अर्जदाराने मागितलेली माहिती काढण्यासाठी तसेच ती इलेक्ट्रॉनिक स्वरूपात मागितली असल्याने तिचे इलेक्ट्रॉनिक स्वरूपात रूपांतर करण्यासाठी प्राधिकरणास जे मनुष्यबळ व खर्च लागेल तो प्राधिकरणाच्या आवाक्या बाहेरचा आहे. "

२९) एका अर्जदाराने त्याच्या माहितीच्या अधिकाराखालील माहिती मागविणेचा अर्ज ई–मेल ने पाठवून दिला. तो माहिती अधिकाऱ्यास १६ ऑगस्ट रोजी प्राप्त झाला. अर्जदाराने स्वतंत्ररित्या पोस्टाद्वारे पाठविलेला अर्जाच्या फी चा ड्राफ्ट २२ ऑगस्ट रोजी प्राप्त झाला. २० सप्टेंबर पर्यंत माहिती प्राप्त झाली नसल्याने आता ती आपण्यास विनामुल्य पुरविण्यात यावी, अशी अर्जदाराने मागणी केली आहे.

३०) आपण प्राधिकरणाच्या कागदपत्रातील माहिती ती फाईल उपलब्ध झाली तरी समजून घेण्यास अक्षम आहोत त्या करिता आपणास त्या कामी आपले सहायकाची मदत घेण्यास परवानगी मिळावी, अशी एका अर्जदाराने मागणी केली आहे.

३१) माहितीच्या अधिकाराखाली ज्याने अर्ज केला आहे अशा व्यक्तीस त्यास माहिती कशासाठी हवी आहे वगैरे प्रश्न विचारता येत नाही. तृतीय पक्षासंबंधी गोपनीय बाबींची माहिती विचारलेल्या एका अर्जदारास माहिती अधिकाऱ्याने तुम्हास ही माहिती पुरविल्यास कोणते जनहीत साधले जाणार आहे ते निर्देशित करा, अशी विचारणा केली आहे.

३२) मंत्रीमंडळाने शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत काही निर्णय घेऊन ते जाहीर केले नंतर एका अर्जदाराने हा निर्णय कोणत्या माहितीच्या आधारावर घेण्यात आला, या निर्णयाची कारणे काय, या संबंधिच्या मंत्रीमंडळापुढील विचारार्थ ठेवलेल्या कागदपत्रांची मागणी केली आहे.